सभा क्रमांक : ५०

जा.क्र./जिपसां/विवि/सभा 3~~8~~0
वित्त विभाग, जिल्हा परिषद, सांगली.
दिनांक : 15/07/15

याव्दारे अर्थ समिती सदस्य मा.श्री/~~श्रीमती~~. [redacted] ____________ मु.पो. ______ तालुका ______ जिल्हा सांगली यांना कळविणेत येते की, अर्थ समितीची मासिक सभा दिनांक 24/07/15 रोजी दुपारी ०२.०० वाजता मा.उपाध्यक्ष जिल्हा परिषद,सांगली येथे खालील नमुद केलेले कामकाज चालविणेकरिता बोलाविणेत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

| | |
|---|---|
| सौ.शुभांगी पाटोळे<br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा<br>सचिव अर्थ समिती जिल्हा परिषद सांगली. | मा.श्री.लिंबाजी महीपती पाटील<br>सभापती अर्थ समिती<br>जिल्हा परिषद सांगली |

327 विषय क्र.१ :- दि.०३.०७.२०१५ रोजी घेणेत आलेल्या वित्त समिती सभेचा अहवाल वाचून कायम करणे.

328 विषय क्र.२ :- शासना कडील महत्वाचे शासननिर्णय व पत्राचे वाचन करणे.

329 विषय क्र.३ :- माहे जून २०१५ चा सर्व खात्यांचा योजना निहाय खाते निहाय अनुदान व खर्चाचा आढावा घेणे

330 विषय क्र.४ :- जि.प.स्वियनिधी व ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील देखभाल व दुरुस्ती सन २०१५-१६ चे प्रथम सुधारीत अंदाजपत्रकास जि.प.सभेची मंजूरी घेणेबाबत चर्चा करणे.

331 विषय क्र.५:- जिल्हा परिषद मुद्रणालयासठी ई-टेंडर द्वारे प्राप्त निविदा मधील निम्नस्तरीय निविदा धारकांसोबत झालेल्या वाटा घाटीनंतर प्राप्त झालेल्या दरांची जि.प.सभेची मान्यतेसाठी शिफारस करणे बाबत.

332 विषय क्र.६:- तेरावा वित्त आयोग व्याजाची रक्कम खर्च करणेबाबतच्या विषयावर चर्चा होवुन शिफस जि.प.सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव पाठविणे बाबत.

333 विषय क्र.७:-माहे एप्रिल १५ व मे १५ अखेर मासिक लेख्रे अर्थ समितीची शिफारस घेवून स्थायी समितीच्या अंतिम मान्यतेसाठी सादर करणे बाबत.

मा.सभापती यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावरती चर्चा करणे.

| | |
|---|---|
| सौ.शुभांगी पाटोळे<br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा<br>सचिव अर्थ समिती जिल्हा परिषद सांगली. | मा.श्री.लिंबाजी महीपती पाटील<br>सभापती अर्थ समिती<br>जिल्हा परिषद सांगली. |

प्रत माहितीसाठी,

१) मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद, सांगली

२) मा.सभापती, ____________________ विषय समिती, जिल्हा परिषद, सांगली.

३) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.

४)मा.सभापती पंचायत समिती,मिरज/तासगांव/विटा/ आटपाडी/कवठेमहांकाळ/जत/वाळवा/शिराळा/पलूस/कडेगाव.

५)खातेप्रमुख जिल्हा परिषद, सांगली,
सामान्य/ग्रा.पं/वित्त/छोपावि/बांधकाम/शिक्षण(प्राथ/माध्य/निरंतर)/ आरोग्य/एन.आर.एच.एम./निर्मल भारत अभियान /सकवि/मबाक/पशुसंवर्धन/ग्रापापु/कृषि /मुद्रणालय/डिआरडिए./ छोलपो /कार्यकारी अभियंता (लघु पाटबंधारे) वारणाली ऑफीस वि.बाग,सांगली.

६) गट विकास अधिकारी पंचायत समिती,
मिरज/तासगांव/विटा/ आटपाडी/कवठेमहांकाळ/जत/वाळवा/शिराळा/पलूस कडेगांव.

**दिनांक २६.०६.२०१५ रोजी तहकूब होवून दिनांक ०३.०७.२०१५ रोजी झालेल्या ४१ व्या अर्थ समिती मासीक सभेचा कार्यवृत्तांत**

**भाग- पहिला**

**उपस्थित सदस्य :**

१. मा.श्री.लिंबाजी महिपती पाटील, उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ समिती.
२. मा.श्री.सुरेश गणपतराव मोहिते पाटील, सदस्य.
३. मा.श्री.भाऊसाहेब शामराव पाटील, सदस्य.
४. मा.श्री.तानाजी हरी यमगर, सदस्य.
५. मा.श्री. दत्ताजीराव निळकंठराव पाटील, सदस्य
६. मा.सौ. सुशिला हिंदूराव नांगरे, सदस्या .
७. मा.सौ. कल्पना वसंतराव सावंत, सदस्या.
८. मा.सौ.रुपाली विक्रमसिंह पाटील सदस्या.
९. मा.श्री.दिलीप दत्तू बुरसे, सदस्य

**उपस्थित अधिकारी :**

१) सौ.शुभांगी पाटोळे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा सचिव वित्त समिती,जि.प.सांगली
२) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा),जि.प.सांगली. प्रतिनिधी.
३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),जि.प.सांगली. प्रतिनिधी
४) कार्यकारी अभियंता,(इ.व द) जि.प.सांगली.
५) कार्यकारी अभियंता, (ग्रा.पा.पु.) जि.प.सांगली.
६) कृषि विकास अधिकारी, जि.प.सांगली.
७) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, प्रतिनिधी जि.प.सांगली..
८) कार्यकारी अभियंता (छोपावि) जि.प. सांगली. प्रतिनिधी
९) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.सांगली. प्रतिनिधी
१०) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला बाल कल्याण) जि.प.सांगली
११) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प.सांगली
१२) शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प.सांगली.
१३) शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.सांगली.
१४) शिक्षणाधिकारी (निरंतर) जि.प.सांगली.
१५) एन. आर. एच. एम. प्रतिनिधी.
१६) प्रतिनिधी सर्व शिक्षा अभियान.

**दिनांक ०३.०७.२०१५ रोजी झालेल्या ४९ व्या अर्थ समिती मासिक सभेचा कार्यवृत्तांत**

**भाग पहिला**

आजच्या अर्थ समितीस उपस्थित असलेले मा.उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ समिती व सदस्य, खातेप्रमुख व कर्मचारी यांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी स्वागत करुन मा.उपाध्यक्ष तथा सभापती यांच्या परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात करणेत आली.

कृष्णा सहकारी च्या संचालक पदी आपले अर्थ समितीचे उपाध्यक्ष तथा सभापती मा.तात्या यांची निवड झालेबद्दल तसेच श्री.केदारराव शिंदे यांच्या पत्नी श्रीम.अलकादेवी शिंदे हया जि.प.सदस्य पदी निवडून आलेबद्दल त्यांचेही अभिनंदनाचा ठराव करणेत आला.

**विषय क्र.१ : मागील दि.०२.०६.२०१५ रोजी घेणेत आलेल्या वित्त समिती सभेचा अहवाल कायम करणे.**

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- शासन निर्णय दि.२७ जानेवारी २००१ नुसार जि.प.स्तरावरील योजना राबविताना पाळावयाचे नियम तसेच लाभार्थींना पुरविणेत येणारे साहित्याचा दर्जा व इतर बाबींबाबत यापूर्वीचे बैठकीमध्ये सूचना देण्यात आल्या आहेतच. त्याप्रमाणे मागील बैठकीतील इतिवृत्ताचा भाग पहिला ठराव क्रमांक ३ तसेच ठराव क्र.२ स्थानिक निधी शकपुर्ततावाबत ३ महिन्यांचे आत लेखापरिक्षण अहवाल सादर करणेबाबत या दोन बाबींचा अंतर्भात इतिवृत्त भाग २ मध्ये करणेत आलेला नाही. तशी दुरुस्ती होऊन इतिवृत्त अंतिम करणेत यावे.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- सर्व खात्यांचे लेखापरिक्षण होऊन तीन महिन्यांचे आत लेखापरिक्षण अहवाल प्राप्त होणे आवश्यक होते. याबाबत लेखी स्वरुपात विचारणा करणेत आली होती तथापि अदयापि कार्यवाही झाली नाही.

श्री.कांबळे (स्था.ले.नि.) : सदर प्रकरणांची तात्काळ माहिती घेण्यात येत आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :-सदर लेखा परिक्षणाच्या संभाव्य तारखा नियोजनाची प्रत अर्थ विभागास पथकाने सादर करावे. तसेच सदर कार्यक्रमाबाबत सन्मा.जि.प.सदस्यांनाही अवगत करावे.

**विषय क्रमांक २ व ३ :- शासनाकडील महत्त्वाचे शासन निर्णय व पत्रांचे वाचन करणे.** तसेच

**विषय क्रमांक ३ :- माहे मे २०१५ चा सर्व खात्यांचा योजना निहाय प्राप्त अनुदान व खर्चाचा आढावा घेणे.**

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी** :- विषय समितीचे बैठकीचे इतिवृत्त मिळालेनंतर खात्याकडील पुढील कार्यवाही करणेत येत आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- केळीवाटप तरतुदींबाबत तांत्रिक मान्यता खात्याने दयावी. त्यासाठी विषय समितीचे मंजुरीची आवश्यकता नाही. प्रशासकीय मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवून खात्याने पाठपुरावा करावा.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- यापूर्वी सर्वसाधारण सभेत ठराव केलेला असून पशुसंवर्धनचा [illegible] स्टाफ मुख्यालयाला राहतो का?

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी** :- जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमधील सूचनेनुसार याबाबत [illegible] काढणेत येत आहे. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सूचनेनुसार वर्ग १ अधिकाऱ्यांनी मुख्यालयीची उपस्थिती प्रमाणपत्र दयावे तसेच ग्रामसेवक यांनी ॲफिडेव्हीट दयावे वर्ग ३ कर्मचाऱ्यांचेबाबत पशुसंवर्धन ए.डी.आय विस्तार यांनी पत्र दयावे असे ठरले आहे.जे मुख्यालयी राहणार नाहीत त्यांचेवर नियमानुसार कारवाई करणेत येत आहे.

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी** :- कामधेनु योजनेबाबत तालुकास्तरावरुन प्रस्ताव प्राप्त करुन देण्यात येत आहेत. गावांची, लाभार्थ्यांची नांवे सूचविणेबाबत पुनःश्च पत्र देण्यात येत आहे. मा.सदस्यांनी गांवांची नांवे सूचवावीत. कुकुटविकास कार्यक्रमांतर्गत अर्जवाटप झाले आहे तसेच अर्जाच्या [illegible] जि.प.सदस्यांनाही उपलब्ध करुन देण्यात येतील इच्छुकांनी लाभ घेणेबाबत आवाहन करणेत येत आहे. कुक्कुट विकास अंतर्गत वर्षभरात ९७ अर्ज प्राप्त असून अदयापि २०० जणांना लाभ देणे बाकी आहे

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- जिल्हा वार्षिक नियोजन नियमाप्रमाणे समितीकडे पाठविणेत यावे आराखडा हा परिपूर्णरित्या सादर करावा. दुभत्या जनावरांचे उत्पन्न वाढविणेच्या दृष्टिने विषय समितीने गतीशीलरित्या निर्णय घ्यावेत. खरेदी प्रक्रिया राबवावी. सदरचा विषय खातेप्रमुख/ विषय समितीच्या बैठकीत घेणेत यावा.

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी** :- दि.१५ जुलै,२०१५ रोजीच्या बैठकीमध्ये सदरील विषयाचा समावेश केलेला आहे. जि.प.हद्दीतील जागेवरील अतिक्रमण काढणेचे प्रस्ताव त्रुटीपूर्ततेसह फेरसादर करणेत येत आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये ठरलेप्रमाणे शिक्षण विभागाने मुख्यालयी हजर नसलेल्या शिक्षकांवर तसेच पती पत्नी एकत्रीकरण नियमाबाबत नियमानुसार कारवाई करावी. जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागेवरील अतिक्रमण काढणेच्या दृष्टिने शासन निर्णयाप्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी. अतिक्रमण असलेस फौजदारी गुन्हा दाखल करणेची कारवाई संबंधित खातेप्रमुखांनी करावी. तसेच खाजगी शिक्षण संस्थांच्या ताब्यातील जिल्हा परिषदेच्या हद्दीतील शाळा खोल्या भाडेवसुलीबाबतची कार्यवाही करावी तसेच भाडेवाढ प्रस्तावाबाबतही तातडीने नियमाप्रमाणे कार्यवाही ठेवावी, जेणेकरुन जि.प.उत्पन्नात भर होईल. रोस्टर तपासणी प्रक्रिया तात्काळ करावी लेखा परिक्षण अहवाल झाल्याची अहवाल प्राप्त करवून घ्यावा. शाळांनी नव्याने संगणक [illegible] करणेपूर्वी विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन जुने संगणक निर्लेखित करणे आवश्यक आहे.

**मा.सौ. कल्पना वसंतराव सावंत, सदस्य** :- शाळा व्यवस्थापन समितीला निधी देऊनही अद्याप [illegible] शौचालये बांधकामे प्रलंबित आहेत अशा प्रकरणी गटशिक्षणाधिकारी यांनी लक्ष देऊन [illegible] करणेबाबत सूचित करणेत यावे.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- शैक्षणिक सुविधा दिलेल्या सर्व साहित्यांची नोंद [illegible] व्यवस्थितरित्या ठेवणेत यावी. डी.पी.डी.सी.मधून नवीन शाळा खोल्या मागणी व दुरुस्ती [illegible] प्रयत्न करावेत. तसेच संगणक प्रयोगशाळा, ई-लायब्ररी, बस्करपट्टया खरेदी, बेंचेस [illegible]

भौतिक सुविधा इ.बाबींकडे विशेष लक्ष दयावे. शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम तसेच अप्रगत मुलांसाठी जादा वेळ देण्यासाठीचे कार्यक्रमांचे प्रभावीपणे अंमलबजावणी करावी.

सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांना से.नि.नंतरचे लाभ तात्काळ देण्याबाबत शिक्षण विभागाने कॅम्पचे आयोजन करावे. त्यामध्ये सेवानिवृत्तीपूर्वी ६ महिने आगोदर संबंधितांचे प्रस्ताव प्राप्त करवून घेऊन त्रुटीपुर्ततेसाठी पाठपुरावा करावा.

**कृषि विकास अधिकारी** :- राष्ट्रीय कृषि विमा योजनेबाबत शासन निर्णयप्रमाणे अतिवृष्टी अगर अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे पीकाचे नुकसान अगर उत्पन्नात घट होत असेल तर पेरणी झालेल्या क्षेत्रासाठी विमा उतरविता येतो, योजनेच्या माहितीसह वीमा हप्त्याची माहिती देण्यात आली.

जि.प.स्वीय निधीतून चापकटर पुरवठा करणे, ताडपत्र्या पुरविणे, बॅटरीवर चालणारे कीटक पुरविणे, स्प्रे पंप पुरवठा करणे, इलेक्ट्रीक मोटर्सचा पुरवठा करणे याबाबत लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही सत्वर करणेत येत आहे. कृषि प्रदर्शनासाठी लेखाशिर्ष निर्माण केले मात्र तरतूद अप्राप्त आहे. बायोगॅससाठी वाढीव अनुदान आलेले आहे तथापि प्रस्ताव अप्राप्त आहेत,नविन असलेस सुचवावेत.

सौर पथदिवे आणि सौर अभ्यासिकेबाबत ग्रामपंचायतीने कृषि विभागास चलन सादर केले शिवाय यादी अंतिम होणार नाही. ग्रा.पं.नाव व चलन प्राप्त व्हावे तदनंतर पुढील कार्यवाही करणे सुलभ होईल. ज्या शाळेला संगणक पुरवठा केलेला आहे त्या शाळेच्या ठिकाणांची यादी दयावी.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- अभ्यासिकेमधील संगणक सुस्थितीत चालतील अशी व्यवस्था असावी. जि.प.हद्दीतील अतिक्रमण जागा भाडेवसुलीबाबत आवश्यक ती कार्यवाही पाठपुरावा करावा जेणेकरुन जि.प.उत्पन्नात वाढ होईल करिता न्यायालयीन प्रकरणी तात्काळ नियमानुसार कारवाई करावी. भिलवडी येथील जागेबाबत निविदा प्रक्रिया काढणेची आवश्यक कार्यवाही व्हावी. कृषि समितीमध्ये हा विषय घ्यावा. जि.प.स्वीय निधीमधील योजनानिहाय अहवाल सर्व विभागांनी सादर करावा. शिल्लक कृषि औषधांची एक्स्पायरी डेट लक्षात घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही ठेवावी तसेच संबंधितांकडून अहवाल प्राप्त करवून घ्यावा.

लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेल्या साहित्यांचे जि.प.तसेच पं.स. स्तरावर स्वतंत्र स्टॉकबुक ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरुन दुबार लाभ मिळणार नाही. गोडांवून तपासणीचा अहवाल योजनावार दर महिन्याला घ्यावा.

**मा.सौ. कल्पना वसंतराव सावंत, सदस्या**:- श्री.डी.सी.लोंढे उपशिक्षणाधिकारी यांचे खातेनिहाय चौकशी प्रकरणी कार्यवाही सत्वर करावी.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- वेतन पथकाकडील शिक्षकांचे वेतन देयके, वेतनवाढ इ.प्रकरणे जाणिवपूर्वक अडविले जातात अशी तक्रार प्राप्त असून संबंधितांना सूचित करावे.

**शिक्षणाधिकारी (माध्य)** :- संबंधितांस सूचना देण्यात येतील. यापुढे शिक्षकांचे वेतन हे ऑनलाईन असलेने त्यामध्ये अशा तक्रारी उद्‌भवणार नाहीत.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- जिल्हा नियोजनबाबत प्राथमिक आरोग्य केंद्रे मंजुरी व विनियोग यांची माहिती दयावी. माहे फेब्रुवारी, मार्च २०१५ पासून आरोग्यकडील दर मासिक सभांचे इतिवृत्ताची प्रत देण्यात यावी.

**जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.सांगली** :- आगामी डीपीडीसीमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकामासाठी नियतव्यय मंजुर करुन घ्यावे लागेल.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- अंगणवाडीतील मुलगा अपघातात मृत्यू पावलेस त्यासाठी लाभ देता येईल किंवा कसे याबाबत अर्थ संकल्पात योजना, लेखाशीर्ष, तरतुद या बाबींसाठी महिला बालकल्याण विभागाने पहावे.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- लोकनेते राजारामबापू तालुकास्तरीय शिबीर दि.१६ ऑगस्ट २०१५ रोजी कवठेमहांकाळ येथे सुरु करीत असलेचे आरोग्य खात्याने सांगितले असता त्यासाठी खात्याकडील प्राप्त तरतूदीनुसार निधी खर्च करावा असे ठरले.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- समाजकल्याण विभागाने अपंग घरकुल कार्यक्रमांतर्गत बांधकामे ही त्या त्या वर्षात पूर्ण होणे अपेक्षित होते. सदर बाबत प्राप्त निधी व घरकुलेबाबत सन २००७-०८ पासूनची मागणीची यादी व आजतागायत केलेली कार्यवाहीचा अहवाल दयावा. अपंगांना स्वयंरोजगारासाठी लाभार्थींना लाभ देणेसाठी लाभार्थी निवड प्रक्रिया सुरु असलेचे खात्याने सांगितले असता लाभार्थी यादी सन्मा.सदस्यांना दाखवून अंतीम करणेचे ठरले. घरकुले पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांना वेळेत लाभ मिळणेच्या दृष्टिने ब्लॉकलेव्हल पासून कार्यवाही व्हावी.

**मा.सौ. कल्पना वसंतराव सावंत, सदस्या**:- मूकबधीर व मतीमंद मुलांसाठी ५ लाख तरतूद आहे. त्याबाबतचा अहवाल दयावा.

**महिला बालकल्याण विभाग :-** शिलाई मशिन व सायकल वाटपअंतर्गत उर्वरित लाभार्थ्यांना लाभ देणेत येत आहेत.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- चिक्की व बिस्कीट घोटाळयाबाबत टेस्टींग व्हावे. अन्न औषध प्रशासनकडे पाठपुरावा करावा.

**जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.सांगली** :- याबाबत शासकीय लॅबोरेटरीकडे नमुने रितसर पाठविणेत आलेले आहेत. दि.३० जून २०१५ च्या दै.लोकमतमध्ये एनआरएचएमकडील नर्स व कंपाऊंडर पदे कंत्राटी पद्धतीने भरणेबाबत जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. त्यानुसार मा. सदस्यांनी नावे सूचवावीत.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- ग्रा.पा.पु.कडील पुरविणेत आलेले वाहनाची फिरती तसेच पाणीपुरवठा सुरळीत होणेच्या दृष्टिने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दयावा.

**विषय क्रमांक ४ :- माहे मे २०१५ अखेर जि.प.तसलमात वसुलीबाबत आढावा घेणे.**

शिक्षण विभागाने पुढील बैठकीपूर्वी वसुलीचा अहवाल दयावा. तसेच कृषि विभागाने वित्त विभागाशी प्रलंबित तसलमातबाबत ताळमेळ घ्यावा. सर्व विभागांनी माहे मे २०१५ अखेर जि.प.तसलमात वसुलीबाबत कार्यवाही करुन केले कार्यवाहीचा अहवाल बैठकीत सादर करावा.

**विषय क्र.५ :- माहे मे २०१५ अखेर जि.प.मुद्रणालयातील वसुलीबाबत आढावा घेणे.**

**विषय क्र.६ :- सांगली जिल्हा परिषद उत्पन्न वाढीसाठी वित्त समिती क्र.३९ दि.२४/०८/२०१२ अन्वये स्थापन केलेल्या अभ्यास गटास एक वर्षाची मुदतवाढ मिळणेस शिफारस करणेबाबत.**

मा.मु.लेखा व वित्त अधिकारी यांनी सदर समिती सदस्यांची नावे सभेस वाचून दाखविली व विषय मान्य करणेत आला.

**विषय क्र.७** - माहे मार्च २०१५ अखेर मासिक लेख्यास अर्थ समितीची शिफारस घेऊन सदरचा विषय मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे पाठविणेबाबत चर्चा करणेत येऊन ठराव समंत करणेत आला.

**यानंतर मा.सभापती यांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयावरती ठराव करणेत आले.**

**विषय क्रं. ५:** सन्मानीय सभापती पंचायत समिती मिरज यांचे माहे मार्च २०१५ ते एप्रिल १५ अखेर प्रवासभत्ता देयके ३ महीन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने म.जि.प.व.पं.स (पदाधिकारी सदस्य व प्र.भ व दै.भत्ता)नियम १९६९ मधील नियम ७(४) नुसार वित्त समितीची मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्रं. ६:** सन्मानीय उपाध्यक्ष तथा सभापती आणि सदस्य अर्थ समिती यांचे माहे मार्च २०१५ ते एप्रिल २०१५ अखेर प्रवासभत्ता देयके ३ महीन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने म.जि.प.व.पं.स (पदाधिकारी सदस्य व प्र.भ व दै.भत्ता)नियम १९६९ मधील नियम ७(४) नुसार वित्त समितीची मान्यता देणेबाबत विचार करणे.

यानंतर मा. उपाध्यक्ष तथा सभापती वित्त समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पारपाडले बददल सर्वांचे पुनःश्च एकदा आभार मानुन सभा संपलेचे जाहिर केले.

सौ.शुभांगी पाटोळे
मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा
सचिव अर्थ समिती जिल्हा परिषद सांगली.

मा.श्री.लिंबाजी महीपती पाटील
सभापती अर्थ समिती
जिल्हा परिषद सांगली.

## भाग दुसरा

## दिनांक २६.०६.२०१५ रोजी तहकूब होवून दिनांक ०३.०७.२०१५ रोजी झालेल्या ४९ व्या अर्थ समिती मासीक सभेचा कार्यवृत्तांत

**विषय क्र.१ :-** दि:०२.०६.२०१५ रोजी घेणेत आलेल्या वित्त समिती सभेचा अहवाल वाचून कायम करणे.

**ठराव क्र. ३१८ :** दि. ०२.०६.२०१५ रोजी घेणेत आलेल्या वित्त समिती सभेचा अहवाल वाचून कायम करणेत आला. ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : मा.श्री. भाऊसाहेब शामराव पाटील, सदस्य.
अनुमोदक : मा.सौ. कल्पना बसंतराव सावंत, सदस्या.

**विषय क्र.२ :-** शासना कडील महत्वाचे शासननिर्णय व पत्राचे वाचन करणे.

**ठराव क्र.३१९:-** शासना कडील महत्वाचे शासननिर्णय व पत्राचे वाचन करणेत आले. ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक:मा.श्री.दत्ताजीराव निळकंठराव पाटील, सदस्य.
अनुमोदक मा.श्री.दिलीप दत्तु बुरसे सदस्य.

**विषय क्र.३:** माहे मे २०१५ च्या सर्व खात्यांचा योजनानिहाय खातेनिहाय अनुदान व खर्चाचा आढावा घेणे.

**ठराव क्र.३२०:** माहे मे २०१५ चा सर्व खात्यांचा योजनानिहाय खातेनिहाय अनुदान व खर्चाचा आढावा घेणेत आला. ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक:मा.सौ.सुशिला हिंदूराव नांगरे, सदस्या
अनुमोदक मा.श्री.दिलीप दत्तु बुरसे सदस्य.

**विषय क्रं.४:** माहे मे २०१५ अखेर जिल्हा परिषद तसलमात वसुली बाबत आढावा घेणे .

**ठराव क्र.३२१:** माहे मे २०१५ अखेर जिल्हा परिषद तसलमात वसुली बाबत आढावा घेणेत आला. ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक:मा.श्री.दत्ताजीराव निळकंठराव पाटील, सदस्य.
अनुमोदक : मा.सौ. कल्पना बसंतराव सावंत, सदस्या. .

**विषय क्रं.५:** माहे मे २०१५ अखेर जिल्हा परिषद मुद्रणालयातील वसुली बाबत आढावा घेणे .

**ठराव क्र.३२२:** माहे मे २०१५ अखेर जिल्हा परिषद मुद्रणालयातील वसुली बाबत आढावा घेणेत आला. ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : मा.श्री. भाऊसाहेब शामराव पाटील, सदस्य.
अनुमोदक : मा.सौ. कल्पना बसंतराव सावंत, सदस्या.

**विषय क्र.६:** सांगली जिल्हा परिषद उत्पन्न वाढीसाठी वित्त समिती क्रं.३९ दि.१४.०८.२०१२ अन्वये स्थापन केलेल्या अभ्यास गटास एक वर्षाची मुदतवाढ मिळणेस शिफारस करणे बाबत

**ठराव क्र.३२३:** सांगली जिल्हा परिषद उत्पन्न वाढीसाठी वित्त समिती क्रं.३९ दि.१४.०८.२०१२ अन्वये स्थापन केलेल्या अभ्यास गटास एक वर्षाची मुदतवाढ मिळणेस शिफारस करणेत आली. ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक:मा.श्री.दत्ताजीराव निळकंठराव पाटील, सदस्य.
अनुमोदक मा.श्री.दिलीप दत्तु बुरसे सदस्य.

**विषय क्रं.७:** सांगली जिल्हा परिषदेचा माहे फेब्रुवारी २०१५ च्या मासिक लेख्याला अर्थ समितीची शिफारस घेवून सदरचा विषय मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे पाठविणेबाबत चर्चा करणे.

**ठराव क्र.३२४:** सांगली जिल्हा परिषदेचा माहे फेब्रुवारी २०१५ च्या मासिक लेख्याला अर्थ समितीची शिफारस घेवून सदरचा विषय मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे पाठविणेबाबत ठराव सर्वानुमते मंजूर करणेत आला.

सुचकः मा.सौ.सुशिला हिंदूराव नांगरे, सदस्या
अनुमोदक मा.श्री.दिलीप दत्तु बुरसे सदस्य.

**यानंतर मा.सभापती यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावरती ठराव करणेत आले.**

**विषय क्रं. ८:** सन्मानीय सभापती पंचायत समिती मिरज यांचे माहे मार्च २०१५ ते एप्रिल १५ अखेर प्रवासभत्ता देयके ३ महीन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने म.जि.प.व.पं.स (पदाधिकारी सदस्य व प्र.भ व दै.भत्ता)नियम १९६९ मधील नियम ७(४) नुसार वित्त समितीची मान्यता देणेबाबत विचार करणे.

**ठराव क्र.३२५:** सन्मानीय सभापती पंचायत समिती मिरज यांचे माहे मार्च २०१५ ते एप्रिल १५ अखेर अखेर प्रवासभत्ता देयके ३ महीन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने म.जि.प.व.पं.स (पदाधिकारी सदस्य व प्र.भ व दै.भत्ता)नियम १९६९ मधील नियम ७(४) नुसार वित्त समितीची मान्यता देणेत येत आहे. ठराव सर्वानुमते मंजूर करणेत आला.

सुचकः मा.श्री.दत्ताजीराव निळकंठराव पाटील, सदस्य.
अनुमोदक मा.श्री सुरेश गणपतराव मोहितेपाटील, सदस्य.

**विषय क्रं.९:** सन्मानीय उपाध्यक्ष तथा सभापती आणि सदस्य अर्थ समिती यांचे माहे मार्च २०१५ ते एप्रिल २०१५ अखेर प्रवासभत्ता देयके ३ महीन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने म.जि.प.व.पं.स (पदाधिकारी सदस्य व प्र.भ व दै.भत्ता)नियम १९६९ मधील नियम ७(४) नुसार वित्त समितीची मान्यता देणेबाबत विचार करणे.

**ठराव क्र.३२६:** सन्मानीय उपाध्यक्ष तथा सभापती आणि सदस्य अर्थ समिती यांचे माहे मार्च २०१५ ते एप्रिल २०१५ प्रवासभत्ता देयके ३ महीन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने म.जि.प.व.पं.स (पदाधिकारी सदस्य व प्र.भ व दै.भत्ता)नियम १९६९ मधील नियम ७(४) नुसार वित्त समितीची मान्यता देणेत येत आहे. ठराव सर्वानुमते मंजूर करणेत आला.

सुचक : मा.श्री. भाऊसाहेब शामराव पाटील, सदस्य
अनुमोदक मा.श्री.दिलीप दत्तु बुरसे सदस्य.

यानंतर मा. उपाध्यक्ष तथा सभापती वित्त समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पारपाडले बददल सर्वांचे पुनःश्च एकदा आभार मानुन सभा संपलेचे जाहिर केले.

सौ.शुभांगी पाटील.
मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा
सचिव अर्थ समिती जिल्हा परिषद सांगली.

मा.श्री.लिंबाजी महीपती पाटील
सभापती अर्थ समिती
जिल्हा परिषद सांगली.